# मुंबई सेंट्रलपर्यंत भुयार खणण्यात यश

## वैतरणा टीबीएमच्या साहाय्याने १५ वा ब्रेक थ्रू




**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गिकेदरम्यानच्या आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलपर्यंतचे भुयार खणण्यात यश आले असून, वैतरणा टीबीएमच्या माध्यमातून १५ वा ब्रेक थ्रू करण्यात आला आहे. केवळ २० महिन्यांत वैतरणा टीबीएमने ३.८१४ किमी बोगदा पूर्ण केला आहे.

आझाद मैदान ते मुंबई सेंट्रल या मार्गावरील डाऊन लाइन बोगदा पूर्ण करणारी वैतरणा ही पहिली टीबीएम मशीन ठरली आहे. जमिनीच्या २० मीटर खाली भूगर्भात बेसाल्ट आणि ब्रेसिया या कठीण दगडातून मार्गक्रमण करत हे काम करण्यात आले असून २७२० सेग्मेंट रिंगचा वापर करण्यात आला आहे. मेट्रो ३ च्या मार्गातील हा १५ वा ब्रेक थ्रू असून, या मार्गिकेवरील मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानक, मुंबई सेंट्रल डेपो, मुंबई सेंट्रल उपनगरीय आणि मरिन लाइन रेल्वे स्थानकावरील प्रवाशांसाठी उत्तम सेवा देणारा ठरणार असल्याची प्रतिक्रिया एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केले. एमएमआरसीएलने १७ टनेल बोरिंग मशीनचा वापर करून ३१ किमी भुयारीकरण पूर्ण केले आहे. पॅकिज २ अंतर्गत एचसीसी मॉस्मेट्रोस्ट्रॉय समूहाकडून काम करण्यात येत असून, या मार्गादरम्यान १४ उंच इमारती, २८ ऐतिहासिक वास्तू आणि जुन्या इमारतींचा समावेश आहे. यांच्या सुरक्षिततेची काळजी घेत हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.

सकाळी १२ च्या सुमारास वैतरणा टीबीएम बोगद्यातून बाहेर आले. या वेळी महाराष्ट्राचे मुख्य सचिव अजॉय मेहता, पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक अनिल कुमार गुप्ता आणि रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.